# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

**शोध समितीतर्फे कुलगुरु पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर हे राज्यस्तरीय व्यावसायिक विद्यापीठ असून त्यामध्ये पशुवैद्यक व पशुविज्ञान, दुग्धतंत्रज्ञान, मत्स्य विज्ञान व पशुवैद्यक व पशुविज्ञान, निम्न शिक्षण विद्याशाखेचा समावेश आहे. विद्यापीठाची स्थापना सन-2000 मध्ये झालेली आहे. विद्यापीठ स्थापनेपासून विद्यापीठाने दर्जेदार शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण याव्दारे विविधांगी योगदान देऊन सामान्यपणे समाजाच्या व मुख्यत्वेकरुन शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक उत्थानामध्ये योगदान दिलेले आहे. विद्यापीठाचे मुख्य ध्येय शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण हे आहे. या विद्यापीठाच्या चार विद्याशाखा असून त्या अंतर्गत राज्यातील विविध भागात दहा घटक महाविद्यालये कार्यरत आहेत. हे विद्यापीठ अधिनियम, परिनियम तसेच राज्य शासन, भारतीय पशुवैद्यक परिषद (VCI), भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR), विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), यांचे विविधअधिनियम व नियमानुसार चालविले जाते.

महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल व या विद्यापीठाचे कुलपती यांनी कुलगुरु पदासाठी योग्य उमेदवारांची शिफारस करण्यासाठी एक समिती गठित केलेली आहे.

उपरोक्त शोध समिती ख्यातनाम विद्यातज्ञ, शास्त्रज्ञ व प्रशासक जे की कुलगुरू पदाची आव्हानात्मक जबाबदारी स्वीकारण्यास तयार असतील व शासन आदेश दिनांक 19 ऑक्टोबर 2010 अन्वये विहित शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत असतील अशा उमेदवारांकडून अर्ज/नामनिर्देशने मागवित आहे. आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव, ऐच्छिक (ईष्ट) अनुभव आणि अपेक्षित कौशल्य व क्षमता, अर्जाचा विहित नमुना इत्यादी सर्व बाबी विद्यापीठाच्या संकेतस्थळ www.mafsu.in वर उपलब्ध आहे.

इच्छुक उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीचे दोन पृष्ठाचे समर्थन, विद्यापीठाबाबतच्या त्यांच्या दृष्टिकोनासंबंधी दोन पानी अहवाल व त्यांच्या कामकाजाविषयी परिचित असणाऱ्या तीन नामांकित व्यक्तिंची नावे यासह विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. तसेच संस्था सुध्दा योग्य उमेदवाराचे नामनिर्देशन करु शकतील.

शोध समितीने **डॉ. एन. पी. साहू, सहसंचालक, भा.कृ.अनु.प.-केंद्रीय मत्स्यपालन शिक्षण संस्था, मुंबई** यांची नोडल अधिकारी म्हणुन नेमणूक केलेली आहे. इच्छुक उमेदवारांनी **दिनांक 03 एप्रिल 2023** पर्यंत कार्यालयीन वेळेत संध्याकाळी 5.30 वाजेपर्यंत उपरोक्त नोडल अधिकारी यांचेकडे खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अर्ज/नामनिर्देशने सादर करावीत. अर्ज सादर करतांना पाकिटावर “कुलगुरु, म.प.म.वि.वि., नागपूर पदाकरिता अर्ज” असे ठळक अक्षरात नमूद करावे.

**डॉ. एन. पी. साहू,**
**सहसंचालक,**
**भा.कृ.अनु.प.-केंद्रीय मत्स्यपालन शिक्षण संस्था,**
**पंच मार्ग, ऑफ, यारी रोड, वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई - 400 061.**
**दुरध्वनी क्रमांक : 9869120627/ ई-मेल : nodalmafsu@gmail.com**

अर्ज करावयाच्या अंतिम दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. शोध समितीला आवश्यकता वाटल्यास निवड योग्य उमेदवारांना त्यांचे बरोबर वैयक्तिक पातळीवर विचार विनियम करण्यासाठी आमंत्रित करण्यात येईल.

शैक्षणिक प्रशासकांना पशुवैद्यक, दुग्धतंत्रज्ञान व मत्स्यविज्ञान क्षेत्रामध्ये शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यात भारतातील एका प्रगत राज्यामध्ये नाविन्यपूर्ण योगदान देण्याची ही अप्रतिम संधी आहे.

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : 04/03/2023**

**स्वा/-**
**अध्यक्ष, शोध समिती**